# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. १९/०६/२०१०**

आज शनिवार दि. १९/०६/२०१० रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. ०८/०६/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| ३) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ४) | जंगम लक्ष्मण गणपत | विरोधी पक्षनेता |
| ५) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ६) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ७) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ८) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ९) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १२) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १३) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १४) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १५) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १६) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १७) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १९) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| २०) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २१) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २२) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २३) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २४) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २५) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २६) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २७) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २८) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २९) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| ३०) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३१) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३२) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३३) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३४) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३५) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३६) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३७) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३८) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ३९) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ४०) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ४१) | वर्षा भानुशाली | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४२) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४३) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४४) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ४५) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ४६) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ४७) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ४८) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ४९) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५०) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ५१) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५२) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५३) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५४) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५५) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५६) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ५७) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ५८) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ५९) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६०) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६१) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६२) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६३) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६४) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६५) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६६) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६७) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ६८) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ६९) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७०) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ७१) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| २) | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | सदस्या |
| ३) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ४) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ५) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ६) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ७) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ८) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ९) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| १०) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | नलावडे दिनेश दगडू | सभापती, स्थायी समिती |
| २) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शनिवार दि. १९/०६/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०२, दि. ०८/०६/२०१० रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**जयंत पाटील :-**

मा. अध्यक्ष महाशय, या सदनात बसणारे, आपल्यासोबत कायमचे गेल्या चार टर्ममध्ये असणारे सन्मा. नगरसेवक श्री. प्रफुल्ल काशिनाथ पाटील यांचे देहांत दि. ०८ मे २०१० रोजी झाले. एक खरोखर असामान्य नेता आणि या महापालिकेसाठी किंबहुना या शहरासाठी ज्यांनी प्रचंड मेहनत घेतली, आपल्या नगराध्यक्षाच्या कालावधीमध्ये ज्यांनी ५० एम.एल.डी. पाण्याची, ११० कोटीची स्किम राबवली आणि या शहराला पाणी देण्याचे महान कार्य केले. त्याप्रमाणे अभिनव विद्यामंदिर या १६००० विद्यार्थी असलेल्या शाळेचे ते कार्याध्यक्ष होते. त्यांनी शाळेची उत्तरोत्तर प्रगती केली. तसेच वेगवेगळ्या सन्मानाने त्यांना पुरस्कार मिळालेले आहेत. माझ्याकडे त्याची संपूर्ण लिस्ट आहे. ती वाचून दाखवणे शक्य होणार नाही. परंतु या शहरातील आगरी समाजातील, मी मुद्दाम समाज बोलतो एक कर्तृत्ववान पुरुष ज्याने एवढी उंच भरारी घेतली की आपल्या कर्तृत्वाने या देशातील तरूणांना वैमानीक बनविण्याचे त्यांचे ध्येय होते. ही माहीतीही पुढे आलेली आहे. त्यांची या शहरामध्ये हत्या झालेली आहे. त्यांची हत्या झाल्यानंतर ही पहिलीच सभा होत आहे. आपल्या सर्वांचे ते जेष्ठ नगरसेवक होते. अभ्यासू नगरसेवक होते. वेगवेगळ्या विषयावर त्यांचे अभ्यासपूर्ण भाषण आपण कायमच ऐकलेले आहे. आणि त्यांच्या भाषणातून, त्यांच्या वक्तृत्वामधून आपल्या शहराचा फायदा झालेला आहे. म्हणून त्यांना आजच्या सभेमध्ये श्रध्दांजली द्यावी. श्रध्दांजली देण्यासाठी ज्या ज्या वक्त्यांना बोलायचे असेल ते त्या विषयावर बोलतील. आणि त्याच्यानंतर ही सभा तहकुब करावी अशी मी सुचना मांडतो.

**अनिल सावंत :-**

या सुचनेला माझे अनुमोदन आहे. नगराध्यक्ष, कॉंग्रेस पक्षाचे जेष्ठ नगरसेवक श्री. प्रफुल्लजी पाटील यांची जी निर्घुण हत्या झाली, प्रशासन आणि मा. महासभा या एका विषयाबद्दल जरी बोलायचे झाले तरी आज प्रत्येक मिटींगचे प्रोसीडींग जर आपण काढून बघितले तर त्या प्रत्येक मिटींगच्या प्रोसिडींगमध्ये जवळ-जवळ ७५ टक्के पेक्षा जास्त प्रोसिडींग ही श्री. प्रफुल्ल पाटील यांच्या अभ्यास विषयक विवेचन त्या प्रोसिडींगमध्ये मिळेल. एक असामान्य कर्तृत्व त्यांनी या शहरामध्ये घडवले आहे. आणि पुढे या शहरामध्ये काहीतरी भव्यदिव्य करायची त्यांची इच्छा होती. मा. सभागृह नेते श्री. जयंतदादा पाटील यांनी जो दुःखद ठराव या ठिकाणी मांडला त्यालाच अनुसरून त्यापुढे जाऊन मी पक्षाच्या वतीने हा ठराव मांडतो आहे. कॉंग्रेस पक्षाचे जेष्ठ नगरसेवक व मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये ज्यांनी आपल्या कर्तुत्वाने खऱ्या अर्थाने या शहराचे नाव रोषन केले. महानगरपालिकेची मा. महासभा असू दे किंवा इतर कार्यक्षेत्र असू दे त्यांचा दांडगा अभ्यास आणि प्रत्येक विषया विषयी असलेले सखोल ज्ञान, अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष आणि कॉंग्रेस पक्षाचे जेष्ठ नगरसेवक प्रफुल्ल काशिनाथ पाटील ह्यांच्यावर दि. ८ मे २०१० रोजी भ्याड हल्ला झाला आणि त्यामध्ये त्यांचे दुःखद निधन झाले. भ्याड हल्ल्याचे माझ्या पक्षातर्फे आणि सर्व सदस्यांतर्फे मी त्याचा निषेध करतो. हा हल्ला खरं तर त्यांच्यावर नव्हता तर पूर्ण शहरावर तो हल्ला होता. अशाप्रकारचे एक व्यक्तीमत्व, ज्याने प्रतिकूल परिस्थितीशी झगडून आपले शिक्षण पूर्ण केले. आपल्या कामधंद्यामध्ये यश मिळवले आणि ते यश मिळवल्यानंतर या शहराबद्दल जे दायीत्व आहे, ते अभिनव शिक्षण संस्था सारखेच शेतकरी संस्था स्थापन करुन त्याच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले त्यांनी फार्मसी, बी.ए., डी.एड., इंजिनिअरिंग सारख्या नविन फॅकल्टीस सुरु केल्या. पायलट ट्रेनिंग स्कूल चालु करण्याचे त्यांचे पुढील स्वप्न होते. या शहरामध्ये त्यांनी एम.बी.ए. सारख्या फॅकल्टीज चालु केल्या. संपूर्ण जगामधून विविध देशांनी त्यांचा सत्कार केलेला आहे. किती तरी प्रकारच्या त्यांना डॉक्टरेट पदव्या मिळालेल्या आहेत. नेपाळ गर्व्हमेंटकडून त्यांना डॉक्टरेट पदवी मिळणार होती आणि त्यांचा सत्कार पुढील काही महिन्यातच होणार होता. परंतु, त्या अगोरदरच हे भ्याड कृत्य या शहरामध्ये घडले आणि त्यामध्ये प्रफुल्ल काशिनाथ पाटील सारख्या एक अभ्यासू, जिज्ञासु नगरसेवकाचे दुःखद निधन झालेले आहे. मा. महासभेच्या सर्व सदस्यांतर्फे मी त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी आणि त्यांच्या कुटूंबियांना या प्रसंगातून बाहेर पडण्यास बळ मिळावं अशी प्रार्थना करुन दुःखवठा ठराव मांडतो.

**लक्ष्मण जंगम :-**

या शहराचे सुपूत्र, मिरा भाईंदर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष, कॉंग्रेसचे जेष्ठ नगरसेवक स्वर्गीय प्रफुल्ल पाटील यांची ०८ तारखेला निघृण हत्या झाली आणि या शहरातील एक अभ्यासू व्यक्ती या शहराने गमावला. सर्वसामान्यांना जसा दिवा जळतो आणि इतरांना त्याचा उजेड देतो, तशा पध्दतीने स्वतःच्या अभ्यासाने इतरांना मदत करण्याची भावना ठेवणारा व्यक्ती म्हणजे श्री. प्रफुल्ल पाटील. प्रत्येक अडीअडचणीला, मग ती प्रशासनाची असू द्या, समाजाची असू द्या, परिसराची असू द्या, शहराची असू द्या, त्या अडीअडचणीमध्ये जाऊन कोणाचे मार्गदर्शन घ्यावे, अशा पध्दतीची कोणाची जर पहिली आठवण लोकांनी करायची, तर श्री. प्रफुल्ल पाटील यांची आठवण व्हायची. मला असे वाटते इतर जणांपेक्षा सर्वसामान्य माणसाला आधार असणाऱ्यांपैकी नाव श्री. प्रफुल्ल पाटील आणि अशा एका अभ्यासू व्यक्तीची अशा पध्दतीने हत्या होणे ही भाईंदरसाठी अतिशय दुखःद आणि लाजिरवाणी गोष्ट आहे. या शहराने बरेच काही अपघात आणि दुर्घटना बघितल्या, ऐकल्या पण ही अशी दुर्घटना होती की, सर्व बाजूंनी सुज्ञ असणारा असा माणूस सर्व समाजाला ज्याचा वारंवार उपयोग होणारा असा माणूस या शहराने गमावला. ही अतिशय दुदैवी घटना आहे.

मी या ठिकाणी माझ्या वतीने, काँग्रेस पक्षाच्या वतीने या सभागृहाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो आणि ईश्वराला प्रार्थना करतो की, त्याच्या आत्म्यास चिरशांती लाभो.

**मिलन पाटीलः-**

श्री. प्रफुल्ल पाटील यांचे दुखःद निधन झाले. या शोकसभेकरीता फार उशीर झाला. यापूर्वीच ही व्हायला पाहीजे होती. या शहराकरीता ही दुखःदायक घटना घडल्यानंतर सव्वा महिना उलटून गेला. आज आमच्या भाईंदर सेकंडरीचे माजी विद्यार्थी, शिक्षणसम्राट खरोखर शिक्षण सम्राट, ज्या माणसाने या भाईंदर वासियांचे इतके विद्यार्थी घडवले. कारण त्या शाळेतून डॉक्टर, वकिल चांगल्या चांगल्या मोठया हुद्दयावर विद्यार्थी गेलेले आहेत. त्यांची इतकी आवड होती की, त्यांनी खूप काही परवानग्या घेऊन आलेले होते. डि.एड. वगैरे शिक्षणाच्या आणखीन दुसऱ्या पदव्या घेऊन आलेले होते. त्याकरीता त्यांची धडपड होती. की, या शहराचे विद्यार्थी कुठे बाहेर जाऊ नयेत. त्यांच्या शिक्षणाकरीता कोणी वंचित राहू नये म्हणून त्यांची ही धडपड होती आणि त्यांनी सरकारकडून मागे लागून खुप काही परवानग्या आणलेल्या आहेत. आत्ता जी संस्था आहे ती पूढे चालवेल. परंतू इतके अभ्यासू आणि हूशार व्यक्तीमत असे श्री. प्रफुल्ल पाटील होते. आमचे खास मित्र होते. आज त्यांचे देहावसन झाल्याकारणाने मी त्यांना श्रध्दांजली वाहतो. त्यांच्या आत्म्याला चिरशांती लाभो. ही परमेश्वराकडे प्रार्थना करतो. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो जय हिंद।

**जूबेर इनामदारः-**

माजी नगराध्यक्ष, काँग्रेस पक्षाचे जेष्ठ सदस्य, सभागृहाचे जेष्ठ जसेच अभ्यासू नगरसेवक श्री. प्रफुल्ल काशिनाथ पाटील यांचे निघृण हत्या झाली असल्याने मी त्यांना श्रध्दांजली वाहतो. मिरा भाईंदर शहराच्या सर्व गरजा व त्या गरजांना पूर्ण करण्याकरीता त्यांची तळमळ सर्व सन्मा. सदस्यांना व शहरातील नागरीकांना त्याची जाणीव आहे. मा. श्री. पाटील साहेब, नगराध्यक्ष असताना ५० एमएलडी पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करताना त्यांनी केलेला प्रयत्न सर्वश्रेष्ठ आहे. या योजनेला पूर्ण करण्याकरीता त्यांचा सिंहाचा वाटा होता. तसेच सभागृहातील त्यांचे सर्व कामकाज अन्य सदस्याकरीता ते फक्त मार्गदर्शक असायचे मला ते माझ्या गुरुसारखेच होते. त्यांच्या निधनाने उत्तम अभ्यासू व या शहरातील गरजांची जाण असलेल्या जेष्ठ काँग्रेस नेत्यास सर्वांनी गमावले. अभिनव शिक्षण मंडळ या संस्थेचे ते कार्याध्यक्ष होते. शिक्षणाकरीता त्यांची चळवळ ही नेहमीच प्राधान्याने राहायची. मा. श्री. प्रफुल्ल काशिनाथ पाटील यांच्या दुःखद निधनाला त्यांच्या कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहेत व त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी ही परमेश्वराचरणी प्रार्थना ओम शांती.

**एस.ए. खानः-**

माजी नगराध्यक्ष आणि नगरसेवक, ज्येष्ठ सदस्य सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटील यांची दि. ०८ मे २०१० रोजी निघृण हत्या करण्यात आली. श्री. प्रफुल्ल पाटील हे आमचे अभ्यासू, नगरसेवक होते, जेष्ठ नगरसेवक होते. ते नेहमी सर्वांना व्यवस्थितपणे मार्गदर्शन करत होते. त्यांच्या निर्घृण हत्येमुळे या शहरात बराच दुखवटा झालेला आहे. मी माझ्या संयुक्त लोकशाही आघाडीतर्फे त्यांच्या हत्येचा निषेध करीत आहे आणि त्यांना श्रध्दांजली वाहतो. ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो अशी प्रार्थना करित आहे.

**चंद्रकांत म्हात्रेः-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष श्री. प्रफुल्लजी पाटील यांची दि. ०८ मे २०१० रोजी निघृण हत्या झाली. प्रथम या सभागृहामध्ये काँग्रेस पक्षातर्फे व सभागृहातर्फे मी त्याचा निषेध व्यक्त करतो. सर्व सदस्यांनी या ठिकाणी आपआपल्याप्रमाणे त्यांना श्रध्दांजली वाहीली. सर्वांनी त्यांच्या कामाची या ठिकाणी माहिती दिली. मला एकच सांगायचे आहे की, श्री. प्रफुल्ल पाटील हे असे एक व्यक्तीमत्व होते की, त्यांना या मिरा भाईंदरमध्ये संपूर्ण या शहरामध्ये लोक पाणीसम्राट, कार्यसम्राट व शिक्षणसम्राट या नावाने सर्व ओळखत असत. खरोखरच सांगायचे म्हणजे, त्यांना ही पदवी लोकांनी बहाल केली होती. ती केवळ पदवी बहाल केली नव्हती, पण प्रामुख्याने त्यांनी पाण्यासाठी या मिरा भाईंदर शहरासाठी जे परिश्रम घेतले ते परिश्रम वाखाणण्यासारखे आहे. पावसाळयाचे दिवस असो, त्यांनी नगराध्यक्ष असताना या शहरामध्ये प्रत्येक ठिकाणी गल्ली बोळामध्ये जाऊन प्रत्यक्षात मिरा भाईंदर शहराच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन, कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन त्या स्थळी, ज्या ठिकाणी गटारे भरली असतील किंवा पाण्याचा निचरा होत नसेल अशा ठिकाणी प्रामुख्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेची टीम घेऊन त्या ठिकाणी नाले खोदकाम करणे, पाण्याचा निचरा कसा होईल त्याचा मार्ग काढणे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असू द्या, ते स्वतः टेमघरला जायचे, पाणी विभागाचे अधिकारी सतत त्यांच्याबरोबर हजर असायचे. त्यांनी दिवसरात्र करुन या शहराचा पाण्याचा प्रश्न सोडवलेला आहे. म्हणूनच लोक त्यांना पाणीसम्राट म्हणत होते. शिक्षणसम्राट म्हणायचे. कारण त्यांना अभिनव शिक्षण संस्थेतर्फे अनेक विद्यार्थी या शहरामध्ये घडवले. त्या शाळेमध्ये एक डिसीप्लेन, म्हणजे कार्यपध्दती कशी असायला पाहिजे ते त्यांनी सर्वांना शिकवले आणि ती अंमलातसुध्दा आणली. असे ते एक धडाडीचे अभ्यासू असे कार्यसम्राट, अभ्यासू नगरसेवक आज आपल्यातून निघून गेलेले आहेत, आणि या शहराचे मला वाटते मिरा भाईंदरमध्ये असा अभ्यासू नगरसेवक ज्यांनी सर्वांना गणपती उत्सव असू द्या किंवा नवरात्री उत्सव असू द्या प्रामुख्याने मला सांगायचे राहून गेले, कोणतेही उत्सव असू द्या आणि कोणत्याही संस्थेचे लोक त्यांच्याकडे

गेले, श्री. पाटील साहेब, आम्हाला आपली जाहीरात पाहिजे तर त्यांनी कुठल्याही कार्यकर्त्यांना नाराज केले नाही त्यांनी विचारले की, कुठून आलात? अमुक ठिकाणावरुन आलो. ठिक आहे. तुम्हाला कोणती जाहीरात पाहीजे, घ्या. ते हसत-हसत जाहीराती द्यायचे आणि त्या जाहीरातीवर लिहीलेले असायचे त्यांचे एकच घोषवाक्य होते पाणीसम्राट, कार्यसम्राट, शिक्षणसम्राट हेच त्यांचे असायचे आणि आपल्याला या मिरा भाईंदरमध्ये सर्वांना बघायलासुध्दा मिळायचे. असे ते खरोखरच कार्यसम्राट, पाणीसम्राट आणि शिक्षणसम्राट असे व्यक्तीमत्व आज आपल्यातून निघून गेलेले आहे. त्यांना आज मी स्वतः आणि सभागृहातर्फे सर्वांना विनंती करतो की, आपण त्यांना श्रध्दांजली अर्पण करुया आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**अनंत पाटील:-**

कै.श्री. प्रफुल्ल पाटील ही व्यक्ती या सभागृहामध्ये नाही, ही खंत प्रत्येकाला असणार आहे. श्री. प्रफुल्ल पाटील यांनी ज्यावेळेला सभागृहामध्ये प्रवेश करावा आणि सर्वांचे लक्ष श्री. प्रफुल्ल पाटील यांच्याकडे असावे. परंतू आज आपल्याला या सभागृहामध्ये श्री. प्रफुल्ल पाटील दिसत नाहीत ते ज्यावेळेला उभे रहायचे, सभागृहातील प्रत्येक नगरसेवकाला त्यांच्यापासून काहीतरी मार्गदर्शन मिळायचे. प्रशासनाची चुक झाली असेल तर त्या चुकी संदर्भात कायद्याचे पुस्तक पाहून या कायद्यानूसार हे प्रकरण आहे असे सातत्याने सांगण्याचा प्रयत्न करत असत आणि नगरसेवकांनासुध्दा ते मार्गदर्शन असायचे. श्री. प्रफुल्ल पाटील गेल्यानंतर त्यांनी बांधलेल्या अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाचे संकुलन, या संकुलनामध्येच त्यांची हत्या झाली. आणि या हत्येमुळे संपूर्ण मिरा-भाईंदरवासीय हतबल झाले. एका चांगल्या व्यक्तीची ज्यावेळेला हत्या होते किंवा तो निघून जातो, तर त्यावेळेला लोकांना जे दुःख वाटते, ते वेगळे असते. परंतू, श्री. प्रफुल्ल पाटील यांची हत्या या मिरा भाईंदर वासियांना काहीतरी सांगून गेली आहे. असे व्यक्तीमत्व शालेय जीवनामध्येच नव्हे तर प्रत्येकाच्या जीवनामध्ये त्यांनी जी-जी कामे केलेली आहेत, ती स्मरणात राहण्यासारखी आहेत. त्यांच्यासारखे व्यक्तीमत्व होणे मिरा भाईंदरमध्ये कठीण आहे. या व्यक्तीमत्वाचे केलेले कर्तृत्व, त्यांचे शैक्षणिक बाबतीत असलेले, त्याचबरोबर त्यांनी पाण्याच्या समस्या सोडवण्याबाबत असलेले योगदान हे निश्चितच मिरा-भाईंदरवासियांना योगदान ठरेल, त्यांची स्मृती त्यांच्यामध्ये निश्चित राहील. आज शिवसेनेतर्फे मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो. जय हींद। जय महाराष्ट्र।

**ओमप्रकाश अग्रवाल:-**

कै. श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, आज आपल्या या सभागृहामध्ये ते नाहीत. याची सर्वांना खंत वाटणार आहे. एक झुंजार नेता म्हणून मी ९७ पासून त्यांना बघतो आहे. या सभागृहामध्ये त्यांनी अनेक विषय घेतलेले आहेत. महत्वाचा विषय सभागृहात सामाजिक कार्य, धार्मिक कार्य हे तर सर्वांचेच आवडते विषय असतात. पण या डहाणूपासून मिरारोडपर्यंत सर्वात ज्वलंत विषय मिठागरांचा आहे. जेव्हा आयोडिनयुक्त मीठ, शासनाने बंदी घातली की, आयोडीनयुक्त मीठच पीकले पाहीजे आणि मिठागरामध्ये जे कामगार आहेत त्यांच्यावर मोठी गदा येणार होती, त्यावेळी श्री. प्रफुल्ल पाटील यांनी मिठागर पिकवणारे म्हणजे जे मॅन्युफॅक्चर्स आहेत, या कोंडीचे जे मालक आहेत, शिलोत्री आहेत यांची संघटना तयार करुन, मला माहिती आहे, एक वेळा नाही दहा वेळा त्यांनी मोठेमोठे मोर्चे काढले. दिल्ली पर्यंत धाव घेतली. असा गोरगरीबांसाठी तडफडणारा असा आमचा मित्र आज आमच्यामध्ये नाही. मला माहिती आहे, मी त्यांच्याबरोबर राजस्थानला, सालासरला गेलो. ते मला रस्त्यामध्ये बोलायचे की, तु चांगला बोलतो. पण काही गोष्टी बोलताना तू विषयांतर करतो. तू विषयांतर करु नको आणि त्याच्यावर लक्ष देऊन तू काही गोष्टी लिहून आण. लिहिल्यानंतर विषयांतर होत नाही. म्हणजे एका चांगल्या नगरसेवकाला आणखीन चांगले कसे बोलता येईल याची जाणीव देऊन त्यांना अजून या शहरासाठी काय करता येईल अशी शिक्षा देण्याचे काम त्यांनी या सभागृहामध्ये केलेले आहे. अभिनव शिक्षण शेतकरी संस्थेचे ते संस्थापक होते. आज सोळा हजार विद्यार्थ्यांचे पालक म्हणून ते काम करत होते. त्यांची ही हत्या दुर्देवी आहे. हत्याऱ्यांच कोणी मालक नसतो, कोणी भाऊबंधु नसतो. त्यांना मारायचे म्हणून मारायचे आहे. या मारलेल्या माणसाचे त्यांना काही नसते. पण या शहराचे मोठे नुकसान झालेले आहे. ही नुकसान भरपाई कधीच होणार नाही. भारतीय जनता पक्षाचा गटनेता या नात्याने मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. ही जी दुर्देवी घटना घडली आहे त्यातून बाहेर निघण्याची शक्ती परमेश्वर त्यांच्या कुटुंबाला देवो हीच विनंती करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**वंदना चक्रे:-**

दिवंगत डॉ. श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, सभागृहाचे झुंजार नेते, नगरसेवक होते हे सगळयांनी सांगितले मी हे न सांगता, त्यांचे गुण सगळयांनाच माहिती होते. नगरसेवकांना तर माहिती आहेतच, पण नविन आलेल्या अधिकारी वर्गालासुध्दा माहिती आहे. मी त्याच्यावर न बोलता सभागृहामध्ये एवढेच सांगेन की, या सभेचे अध्यक्ष आदरणीय महापौर साहेब, उपमहापौर श्री. स्टीवन मेंडोंसा साहेब, मा. आयुक्त साहेब आणि सगळे सदस्य, सगळे अधिकारी वर्ग, इंजिनिअर, पत्रकार, माझे बंधु आणि भगिनींनो, डॉ. श्री. प्रफुल्ल पाटील यांची जी हत्या झाली. मी त्याच्या संदर्भात एकच शब्द बोलणार आहे. हे सभागृहात बोलण्याचे नाही, परंतू हा विषय आला आणि बोलतात म्हणून मी बोलते. परवाच्या दिवशी जेव्हा त्यांच्या श्रध्दांजलीचा कार्यक्रम झाला त्या दिवशी मला बोलायची इच्छा होती परंतू मी लेट आल्यामुळे मला बोलायला मिळाले नाही. मी या

ठिकाणच्या नगरसेवकांना एकच विनंती करेन की, ज्यांनी हत्या केली ते आरोपी, ओरीजनल आरोपी मिळाले पाहिजेत. हत्या करणा-यांच्या मागे जो कोणी असेल, त्यांना पकडले पाहीजे. तरच डॉ. श्री. प्रफुल्ल पाटील यांना श्रध्दांजली वाहिली हे सिध्द होईल. नाहीतर त्याचा काहीच उपयोग होणार नाही. आपण भाषण करतो, बोलणार कोणी केले, कसे केले, का केले, तरुण होते,वयाने अगदी लहान होते. हुशार माणसांवर ही वेळ का? असे मला म्हणायचे आहे. ते तज्ञ, बुध्दीमान सगळे होते आणि अशा ठिकाणी त्यांची हत्या झाली ज्या ठिकाणी त्यांचे अतिशय चांगले भव्यदिव्य काम चालू होते, त्यांच्या शाळेमध्ये. तेही फार मोठे चुकीचे झालेले आहे. मी या ठिकाणच्या सगळया नगरसेवकांना एकच म्हणेन की, एखादा असा प्रोग्राम लावा की, आम्ही राष्ट्रवादीचे असतानासुध्दा श्री. आर.आर. पाटील यांच्याकडे त्यांचा फॉलोअप करायला आमच्या राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने मा. आमदारांपासून सगळे नगरसेवक, नगरसेविका तुमच्यासोबत राहू. त्यांचे खरे आरोपी पकडा आणि त्यांना इथे फाशीची सजा मिळाली पाहिजे. तरच आपण खरे श्री. प्रफुल्ल पाटील यांची श्रध्दांजलीची सभा केली आणि झाली हे सिध्द होईल. नाहीतर काही उपयोग होणार नाही. माझा दुसरा मुद्दा असा आहे की, श्री. प्रफुल्ल पाटील यांच्या मिसेस इथे नाहीत. ज्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. मी त्या ताईंना इथे एवढेच सांगेन, माझा मॅसेज तुमच्यापर्यंत जाणारच आहे. ताई, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. आम्ही मरणाला, मी वंदना चक्रे घाबरणार नाही. मी सुध्दा तशीच स्ट्रॉंग महिला आहे. पण मी एक सांगेन, ताई आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. तुम्ही म्हणाल तिथे यायला आम्ही तयार आहोत. तुम्ही पूर्ण फॉलोअप करा. तुम्हाला ज्याचा डाऊट येत असेल, ते आम्हाला सांगा, आम्ही तुम्हाला मदत करायला तयार आहोत. तिसरे मी असे सांगेन की, या ठिकाणच्या सगळया नगरसेवकांना, मान्यवरांना ज्या ठिकाणी त्यांची हत्या झाली, त्या ठिकाणी श्री. प्रफुल्ल पाटील यांचा पुतळा असावा अशी माझी सुचना आहे, याची आपण नोंद घ्यायची आहे. मी जास्त न बोलता आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने दुःखाने आमचे श्री. प्रफुल्ल पाटील यांना मी श्रध्दांजली वाहते व चक्रे कुटूंबाच्या वतीने, ज्या संस्थेवर मी कार्यरत आहे त्या संस्थेच्या वतीने मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करते. एवढे बोलून मी इथेच थांबते. जय हिंद।

**नरेंद्र मेहताः-**

स्वर्गीय श्री. प्रफुल्ल पाटीलजी, आज खरोखरच त्यांची अनुपस्थिती या सभागृहात जाणवते. श्री. प्रफुल्ल पाटील हे पहिल्यांदा, ज्या ठिकाणी मी राहतो त्या ठिकाणी निवडून आले होते. गेल्या १८ वर्षापासून मी त्यांची कार्यपध्दती बघितलेली आहे. ब-याचशा लोकांची राजकारणाची सुरुवातसुध्दा श्री. प्रफुल्ल पाटील यांच्या माध्यमातून झालेली आहे. ते माझे चांगले मार्गदर्शक होते. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अनेक प्रश्नावर त्यांचा अभ्यास होता. मग अधिकारी वर्ग असू द्या, कुठल्याही पक्षाचे नगरसेवक असू द्या. नेहमी त्यांच्या सल्ल्याबद्दल आम्ही त्यांना विचारायचो. श्री. प्रफुल्ल पाटील यांचे आणि या मिरा भाईंदर शहराचे एक घनिष्ठ नाते होते. श्री. प्रफुल्ल पाटील यांच्या डोक्यात पूर्ण मिरा भाईंदरची रचना होती. कोणते आरक्षण कुठे आहे, कोणता नाला कुठून वाहून कुठे जातो, कोणत्या क्षेत्रात पाणी भरणार आहे, का भरणार आहे, कोणता विषय अडचणीचा ठरणार आहे, कोणता विषय शहराच्या हिताचा ठरणार आहे, हा सर्व त्यांचा अभ्यास होता. कोणत्याही विषयाचा अजेंडा त्यांच्यासमोर आला की, त्यांच्या डोक्यातील कंम्यूटर माईंड चालू व्हायचा आणि त्याची माहिती ते आम्हाला द्यायचे. काल रात्रीची गोष्ट ज्यावेळी आम्ही आमची मा. महासभेची तयारी करत होतो. काही असे प्रश्न वाटले की, एखादा सल्ला घ्यायला पाहीजे, त्यावेळी श्री. प्रफुल्ल पाटील यांची आम्हाला खरोखर आठवण आली. श्री. प्रफुल्ल पाटील यांनी कुठल्याही पक्षाचा विचार न करता, मग तो राष्ट्रवादी असू द्या, कॉंग्रेस असू द्या, भाजप असू द्या, सेना असू द्या, इतर पक्ष असू द्या त्यांनी नेहमी चांगला सल्ला सर्व पक्षांना या शहराच्या हितासाठी दिलेला आहे. खरोखरच श्री. प्रफुल्ल पाटील यांची कमी ही कधीही पूर्ण केली जाणार नाही. भारतीय जनता पार्टीच्या वतीने आम्ही सर्व त्यांना श्रध्दांजली वाहतो. आणि ईश्वर त्यांच्या कुटुंबाला शक्ती देवो. ओमशांती.

**प्रभात पाटीलः-**

या शहराचे माजी नगराध्यक्ष आणि या सदनाचे सदनाच्या निर्मितीपासूनचे सदस्य, ज्यांनी नगरपालिका ते महानगरापालिका असा चार टर्मचा प्रवास केला. आणि यशस्वीरित्या केला. नगरसेवक बरेचजण बनतात. परंतू इतका अभ्यासू, नेतृत्व, कर्तृत्व आणि नितीमत्ता यांचे त्रिवेणी संगम असलेला असा हा असामान्य नेता की, ज्यांना कोणत्याही अवघड विषयाची कधी भिती वाटली नाही. आणि हे त्यांच्याकडून शिकावे ज्यांनी या शहराच्या मातीशी अगदी ईमान राखले. या मातीत जन्मल्याचे पांग त्यांनी फेडले. या शहराचे खरे सुपुत्र म्हणून ते शोभले. आपल्या नगरसेवक पदाच्या कारकिर्दीत ज्यांनी मृत्यूला कवटाळले म्हणण्यापेक्षा त्यांना मातीत ज्यांनी मिसळले अशा निंदक कृत्याचा मी निषेध करते. आपण सर्वजण निषेध करु या. परंतू, श्री. पाटील साहेबांचे जे अलौकीक असे व्यक्तीमत्व होते, या मातीशी, या शहराशी या नगराशी त्यांचे जे इमान होते. नगराचा ध्यास हे ज्यांचे स्वप्न होते आणि त्या ध्यासापोटी स्वतःला समर्पण करण्याची भावना ज्यांच्यामध्ये होती, मग त्याच्यासाठी रात्रीचा दिवस करण्याची सुध्दा या व्यक्तीमत्वाची, या व्यक्तीची तयारी होती. कधी कधी कौतुक वाटायचे की, इतकी असामान्य बुध्दीमत्ता या माणसाकडे कशी? विज्ञानाच्या भाषेत असे म्हणतात की, सगळयांकडे सारखीच बुध्दीमत्ता असते आणि ही गोष्ट तितकीच खरी आहे. परंतु, त्या बुध्दीचा वापर

कुठे, कसा आणि किती करावा याचा सखोल अभ्यास करुन आपल्या बुध्दीचा आपल्यातील नेतृत्वाचा, आपल्यातील विद्वत्तेचा फायदा ज्यांनी समाजासाठी, या शहरासाठी केला असे असामान्य व्यक्तीमत्व म्हणजे श्री. प्रफुल्ल पाटील. आपण त्यांच्या खुप गुणांचा इथे उहापोह केला. राजकारण आणि शिक्षण या त्यांच्या व्यक्तीमत्वाच्या दोन बाजू होत्या. आपण इथे जास्तीत जास्त त्यांना राजकारणी म्हणून आपल्या नेत्यांनी आपल्याला सुनावले. परंतू, शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये त्यांचे काम हे मला वाटत नाही की, येणाऱ्या पन्नास वर्षामध्ये त्यांची जागा कोणी घेऊ शकेल. त्यांना मिळालेले विविध पुरस्कार हे त्याचेच द्योतक आहे. परंतू, ज्या शिक्षण संकुलामध्ये ते काम करत होते, त्या शिक्षण संकुलाचा एक छोटासा अंश म्हणून मी त्यांना पाहीले आहे. गेली २४ वर्षे त्या शाळेत वावरत असताना श्री. पाटील साहेबांचा एक दिवस असा गेला नाही की, त्या संकुलामध्ये त्यांनी पाय ठेवला नाही. श्री. पाटील साहेब, एक असे व्यक्तीमत्व होते की, त्या संकुलामध्ये पाय ठेवल्यानंतर, मी एक शिक्षक म्हटल्यानंतर एक छोटासा भाग आहे, ज्याने फक्त आपले काम करायचे असते. पण इतका भितीयुक्त आदर त्यांच्या विषयी शिक्षकांमध्ये होता. किंबहूना अगदी खालच्या कर्मचाऱ्यांमध्ये होता. की, हा माणूस इथे आले आहेत किंवा ही व्यक्ती इथे आली आहे. इतके बारकाईने लक्ष असायचे की, स्वच्छता वर्गामध्ये शिक्षकांचे काम, सुपरवाईझर्सचे काम, मुख्याध्यापकांचे काम आणि विशेष म्हणजे हया संस्थेला, हया वर्गांना, हया शाळेला काय हवे आहे, काय नको आहे. ही शाळा न राहता इतके मोठे विद्यालय संकुल झाले आहे. शिक्षणाचे एक फार मोठे क्षेत्र, आपण जवळ-जवळ असे म्हणूया की, मिरा भाईंदरचे एक फार मिनी विद्यापीठ त्या अभिनव संकुलामध्ये कधी आणि केव्हा तयार झाले हे आम्ही तिथे कार्य करत असतानासुध्दा कळले नाही. फार कधी तरी कानावर यायचे की, ही परवानगी मिळाली, ती परवानगी मिळाली, आत्ता हे होणार आहे, तिथे डी.एड. कॉलेज होणार आहे. बी.एड. होणार आहे. इंजिनियरींग येणार आहे. बरेचसे काय-काय येणार आहे. एमसीए येणार आहे. बीसीए येणार आहे. कधीतरी फोन करुन सांगत असत आणि त्यांच्या त्या फोनमध्ये इतका उत्साह असायचा की, मी हया परवानग्या आणल्या, त्या परवानग्या आणल्या. असे वाटायचे की, आपण इथेच त्यांना राजकारणी म्हणून बघतो किंवा राजकारणाचा एक भाग म्हणून पाहतो. परंतू, त्या क्षेत्रामध्ये त्यांची धडाडी, त्यांची झेप पाहिल्यांनंतर असे वाटायचे की, आपण नक्कीच तिथपर्यंत झेप घेऊ शकणार नाही. पण त्यांच्या हया झेप घेण्याचे पंख छाटले गेले. समाजातील काही विकृत प्रवृत्तींनी त्यांच्यावर घाला घातला आणि एक उमदे नेतृत्व आपल्यातून निघून गेलेले आहे. समोर राहिलेली रिकामी खूर्ची या सभागृहामध्ये नेहमीच त्यांची आठवण करुन देत राहील. एक धडाडणारी तोफ श्री. प्रफुल्ल पाटील उठून उभे राहिले की, आपला सर्वांचा अनुभव आहे की, आपण जर कोणाशी गप्पा मारत असू कींवा फोनवर बोलत असू तर आपले मोबाईल बंद व्हायचे कारण श्री. पाटील साहेब काय बोलतात, किती सखोल बोलतात याच्याकडे आपोआपच आपले कान टवकारले जायचे. तर एक धडाडणारी तोफ शांत झालेली आहे. आणि असे असामान्य व्यक्तीमत्व आपल्यातून निघून गेल्यामुळे साहजिकच आपल्या मिरा भाईंदरच्या राजकीय क्षेत्रामध्ये सुध्दा भुकंपच झालेला आहे. पण श्री. पाटील साहेबांचे जे चांगले गुण आहेत ते आपण नक्कीच घेतले पाहीजे. आणि या शहराच्या विषयी त्यांची जी तळमळ होती ती त्यांच्या अनुपस्थितीमध्येसुध्दा आपण त्यांच्यापासून त्यांचे काम पुढे करुन ती जाणीव, ती उणीव आपण नक्कीच भरुन काढली पाहीजे हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल असे मला वाटते.

**मिलन म्हात्रेः-**

आज या सभागृहामध्ये कै. श्री. प्रफुल्ल पाटील यांची श्रध्दांजली वाहताना सर्वजण स्तब्ध आणि सद्गधीत झालेले आहेत. राजकीय पक्षाचे कार्यकर्ते या नात्याने जवळ-जवळ तीस वर्षापासूनचा त्यांचा बाहय संबंध म्हणजे बाहेरचा. परंतू, सभागृहात १९९९ पासून २००० पासून त्यांच्या बरोबर सर्वप्रथम या सभागृहामध्ये मी नगरसेवक झालो. तेव्हा ते नगराध्यक्ष असताना त्यांच्या हातून पुष्पगुच्छ मिळण्याचा मान मला सर्वप्रथम म्हणजे आयुष्यात पहिल्यांदा याच सभागृहामध्ये, याच व्यासपीठावर आणि याच मंचावर मिळाला. त्यानंतर मात्र काम करत असताना याच सभागृहामध्ये श्री. प्रफुल्ल पाटील एकटे पडलेले सुध्दा मी बघितलेले आहेत. त्यांच्या बरोबरचे सहकारी, पक्षातील स्वपक्षीय शर्टाच्या बाहया वर करुन मारामाऱ्या करायच्या भाषा करतानासुध्दा आम्ही बघितलेले आहेत. त्याचा मी एक साक्षीदार आहे. या सभागृहामध्ये केवळ नऊ नगरसेवक आम्ही उपस्थित असताना त्यावेळेच्या तत्कालिन नगरपरिषदेच्या मिटींग चालवताना आमच्यात समन्वय साधून नऊ नगरसेवकांवर मिटींग चालवलेल्यासुध्दा मी बघितलेल्या आहेत. आणि असे म्हणतात म्हणा किंवा प्रॅक्टीकल जे वास्तव आहे ते. की, आपल्या घरातील एखादी मार्गदर्शक व्यक्ती, एक महत्वाची व्यक्ती, आई,वडील, मोठा भाऊ, छोटा भाऊ, काका किंवा समाजामध्ये गुरुजन असतात. सांगायचे तात्पर्य की, महत्वाची मार्गदर्शक अशी एखादी व्यक्ती किंवा वस्तू ही ज्या दिवशी हरवते, किंवा आपल्यातून नाहीशी होते, तिचा आपल्याला अभाव यायला लागतो, तिचा तुटवडा भासायला लागतो, त्यावेळेला त्या वस्तुची खरी किंमत माणसाला उपजते आणि कळते असे माझे स्वतःचे मत आहे. ती वस्तू गेल्यानंतर त्याची किंमत कळते. असताना त्या माणसाला, व्यक्तीला त्या वस्तूला समाजामध्ये किंमत नसते, राजकारणातसुध्दा नसते आणि घरातसुध्दा नसते. याच सभागृहामध्ये अनेक वेळा श्री. प्रफुल्ल पाटील हे फार चांगले वक्ते होते, अभ्यासू होते, सगळे होते. पण एक लोकप्रतिनीधी या नात्याने मला अत्यंत वाईट वाटते की, सभागृहात बोलत असताना त्यांच्यापेक्षा ज्युनिअर

नगरसेवक, काल परवा आलेले, आमच्या समोर निवडून आलेले म्हणजे त्यांना आत्ता तीन वर्षे होत आली, असे नगरसेवकसुध्दा त्यांची टिंगलटवाळी करुन त्यांना खाली बसविण्याचा प्रयत्न, त्यांची मानहानी करण्याचा प्रयत्न याच सभागृहात आम्ही गेल्या मिटींगपर्यंत बघितलेला आहे. गेल्या मिटींगमध्ये शिवीगाळ होऊन मारामारी व्हायची वाचलेली आहे. गेल्या मिटींगचे प्रोसिडींग काढले तर हे सगळे दिसेल. हे याच्याकरीता म्हणतो की, आज आम्ही दहा वर्षे नगरसेवक आहोत. याच्यापूढे आम्ही काही अमरपट्टा घेऊन आलेलो नाही. आज ना उद्या आम्ही या सभागृहात नसणार. पण येणारा जो तरुण वर्ग आहे, येणारी जी तरुण पिढी आहे, या सभागृहात आजच्या तारखेला अस्तित्वात असलेली आणि पुढे भविष्यात येणारी. मला माहिती आहे आजही विधानसभेमध्ये, विधानपरीषदेमध्ये नवनिर्वाचित चांगले चांगले अभ्यासू आमदार श्री. व्यकप्पा पत्कींसारखे ज्यांनी महाराष्ट्राची विधानपरिषद गाजवली. या मिरा भाईंदरच्या पाणी प्रश्नावर रणकंदन माजवले आणि तिकडून मिरा भाईंदरच्या जनतेला न्याय मिळवून दिला. त्यांच्यासारखा अभ्यासू आमदारसुध्दा विधानपरिषदेच्या चौदाव्या माळयावरच्या लायब्ररीमध्ये जाऊन त्याच्या पूर्वीच्या सिनीअर आमदारांचे जे काही कामकाजाचे उतारे आहेत, त्यांनी कामकाज कसे चालवले, त्याचा उतारांचा अभ्यास आणि त्या अभ्यासाचे पालन त्यांनी केले. सांगायचे तात्पर्य असे की, आपल्यापेक्षा ज्येष्ठ नगरसेवक, माणसांकडून चुका होतात. देवाकडून झाल्या आहेत, ईश्वराकडून झाल्या आहेत, सगळयांकडून झाल्या आहेत. आपण तर माणूस आहोत. यंत्रपण कधी-कधी चुकते. परंतू, अत्यंत अशी म्हणजे शेवटी शेवटी एखाद्या व्यक्तीला किती एकटे पाडायचे, एखाद्या व्यक्तीवर किती आकस करायचा यालासुध्दा काहीतरी एक दर्बंध, निर्बंध, त्याला काहितरी लिमिटेशन असते. हया सभागृहामध्ये ती पातळी खाली गेलेली आम्ही बघितलेली आहे. गेल्याच मिटींगची गोष्ट आहे. आज ती खुर्ची खाली आहे. पण या खुर्चीवर गेल्या मिटींगमध्ये ब-याचशा वादावादी झाल्या. याचे साक्षीदार आपण सगळे आहोत. आज परिस्थिती एवढी बिघडलेली आहे की, कुठल्याही क्षेत्रामध्ये सत्य बोलणारा संघर्ष करणारा, सत्याच्या बाजूने राहणारा, शिस्त लावणारा मग ती शाळा असो, नगरपालिका असो, महानगरपालिका असो, शासकिय कार्यालय असो. या ठिकाणी जो माणूस खरे बोलतो, जो माणूस योग्य वेळेला वेळेवरच पटकन बोलतो, जी चुक दृष्टीपथात आणतो, तो माणूस सगळया सभागृहामध्ये, पक्षामध्ये लोकांना नकोसा होत असतो. त्याचे परिपाक काही लोकांना भोगावे लागतात आणि ते भोगतातही. आज परिस्थिती या सभागृहामध्ये श्री. प्रफुल्ल पाटील नसल्यामुळे बरेचसे कायदे, जी.आर., मी मागे बसून त्यांचे भाषण फार ऐकलेले आहे. त्यांनी कधीही बोलले. मला रिक्वेस्ट केली की, श्री. म्हात्रे साहेब मला बोलायचे आहे, तर मी खाली बसायचो, त्यांना मान द्यायचो. पण त्यांच्या भाषणामध्ये न्यायालयाचे निवाडे, गव्हर्नमेंटकडून वेळोवेळी आलेली पत्रके, मागे एका विषयामध्ये त्यांनी भिवंडीचे पत्र ठेवले, सी.एफ.सी. च्या मुलांना कामावर घेण्याकरीता. भले मग ते त्यांच्याकडे मिळवणे तोही एक सोर्स आहे. पण ते मिळवले, त्यांनी मा. आयुक्तांना वाचायला दिले. गव्हर्नमेंटचे जी.आर. आणि सगळयात जास्त म्हणजे शिक्षण क्षेत्रातील कोणताही विषय महापालिकेत आला तर श्री. पाटील साहेब काय म्हणतात हे माझ्यासारखा माणूसपण शांतपणे ऐकत असे. त्याच्यातून काहीतरी शिकत असे. कारण त्या क्षेत्रातील ज्ञान मला नाही, त्यांना आहे. हे सुर्यप्रकाशाएवढे स्वच्छ आहे असे आपण मान्य केले पाहीजे की नाही? शिक्षण क्षेत्रातील ज्ञान श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांना आहे, त्यातील थोडे ऐकले पाहीजे. आम्ही शांतपणे त्यांचे ऐकायचो. आणि त्याच्यातून काहीतरी चांगले निघायचे. आज या सभागृहामध्ये प्रशासनाला हा जो प्रसंग आहे, याच्यामध्ये कुठे उणेधुणे काढण्याची नाही, पण ही जी शोकसभा आहे, त्याचे एक पत्र काढले गेले. मा. महापौर साहेब ही परिस्थिती खराब आहे. म्हणजे असे होऊ नये. प्रशासनाच्या चुका म्हणा, आपल्या चुका म्हणा. पण माझ्या घरात एक पत्र आले. माझ्या मिसेसला त्या प्यूनने दिले. त्याच्यामध्ये श्री. प्रफुल्ल पाटील यांच्या शोकसभेचा विषय होता आणि एक विशेष खास सभा, पण लगेच त्या प्यूनला काय वाटले माहीत नाही, त्याने लगेच नंतर परत मागून घेतले आणि ते नेले आणि आज ती सभा रेग्युलर विषय बाजूला ठेवून इतका महत्वाचा विषय, सभागृहातील एक जूना जाणता आणि मी तर म्हणेन की, प्रथम नगराध्यक्ष, प्रथम आमदार म्हणण्यापेक्षा माझ्या माहितीनूसार या सभागृहातील प्रथम अष्टपैलू नेतृत्व असे एक श्री. प्रफुल्ल पाटील हि व्यक्ती होती. कारण हया डायसवर बसून त्यांनी कधीही मला हे माहीती नाही असे कधी सांगितले नाही. सर्व गुण संपन्न असे एक नेतृत्व होते. सर्व क्षेत्रामध्ये विद्याविभुषीत तर होते, त्यात काही वादच नाही. पण कधी आम्ही अडलो-पडलो, कधी फोन केला तर त्यांनी कधी स्वतःचा पक्षीय वाद आणला नाही. आणि कधी कोणावर टिका टिपण्णी, माझ्या माहीतीनूसार तरी, आमच्यासमोर केली नव्हती. आज या इतक्या मोठया व्यक्तीला, माजी नगराध्यक्ष, एक्झीस्टींग नगरसेवक, निधन झाल्यानंतर जवळ-जवळ ८ जूनला त्यांना एक महीना झाला आणि आज आपण १९ जूनला आहोत. म्हणजे जवळ-जवळ सव्वा महीना ते एक महिना एक आठवडा प्रशासनाने एक विशेष सभा बोलवून जर ही शोकसभा त्यांच्या निधनानंतर तीन-चार दिवसामध्ये किंवा दोन दिवसांत लावली असती तर त्या व्यक्तीला आपण सभागृहाने आणि प्रशासनानेसुध्दा एक विशिष्ट प्रकारचा मान, मेल्यानंतरचा मान हा फार कमी लोकांना मिळतो. लोक विसरतात, कितीही चांगले केले तरी लोक बोलत नाहीत, पण मेल्यानंतरचा मान प्रशासनाने दिला नाही ही निषेधार्थ बाब आहे. असे परत कधी होऊ नये. म्हणजे त्याच वेळेला जर ते केले तर त्याच्यामध्ये एक निराळे वेटेज असते. आज आपण कितीही बोलले तरी आज दिवस अपूरा पडेल. आज श्री. प्रफुल्ल पाटील आमच्यात नाहीत, ब-याच वेळेला जी माहिती, जे शिक्षण

जे पैसे देऊनसुध्दा मिळत नाही ते अनुभवाने मिळते. ते आज आम्ही वंचित झालेले आहोत. सभागृहातील एक ज्येष्ठ नगरसेवक, या सदनात यापूढे नसणार आहे. त्यांचा जो वाद घालताना टिपेला चढलेला आवाज, ते करत असलेले हातवारे, हे चित्र यापूढे दिसणार नाही. समोरच्या रांगेतील तिसऱ्या क्रमांकाची खुर्ची आज खाली आहे, उद्या कोणतरी बसेल. पण ती जागा, त्या जागेवरून जे दृश्य दिसायचे. प्रशासनाला काही निर्णय घ्यायला भाग पाडायचे. त्यावेळेला सभागृहातील मतदान, मेजोरीटी काय आहे हे बाजूला ठेवून नियम-कायदे सगळे दाखवून प्रशासनाला योग्य वेळी योग्य निर्णय घ्यायला भाग पाडायचे. आज ती कला असलेली व्यक्ती आपल्यामध्ये नाही, ही या शहाराचे, या सभागृहाचे, या अधिकाऱ्यांचे आणि या करदात्या जनतेचेसुध्दा फार मोठे अपरिमित भरुन न येणारे नुकसान झालेले आहे. आज या ठिकाणी मी माझ्या जनता दल (सेक्यूलर) या पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली वाहतो. एवढे सगळे सांगून मी माझी श्रध्दांजली समाप्त करतो. हरी ओम शांती.

**मर्लिन डिसाः-**

स्वर्गीय श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, एक बुध्दजीवी नगरसेवक थे। मैने उनको यही देखा, जब भी मा. महासभा होती थी, वह पुरी तैयारी के साथ अपनी बॅग और बुक्स के साथ आते थे। उनके Question meaningful रहते थे। और उनके Answer प्रमाणित रहते थे। और हम जैसे नविन नगरसेवकों के लिए एक अनुभव था की, हम लोग उनके लेक्चर आराम से सुनते थे। हमे सिखने को मौका मिलता था। यह एक ऐसा निर्घृण हत्याकांड हुआ है, जिसकी जितनी निंदा कि जाए उतनी कम है। भगवान उनके परिवार को इतनी शक्ती दे की, वो ऐसा पहाड जैसा दुःख झेल सके। मेरी ओर से उनको विनम्र श्रध्दांजली।

**हेलन गोविंदः-**

जोपर्यंत व्यक्ती जिवंत असते तोपर्यंत त्या व्यक्तीचे महत्व कळत नसते. परंतू, खरोखरच आज श्री. प्रफुल्ल पाटील साहेब मरुन पडल्यावर त्यांचे संपूर्ण व्यक्तीमत्व या संपूर्ण मिरा भाईंदर शहराला समजलेले आहे. आपण सभागृहामध्ये प्रत्यक्ष बघितलेले आहे की, ते उभे राहिले की, संपूर्ण अधिकाऱ्यांपासून, सर्व पदाधिकाऱ्यांपर्यंत, नगरसेवकांपर्यंत सर्वांना ते योग्य प्रकारे मार्गदर्शन करत होते. आणि मला वाटते ही माझी तिसरी टर्म आहे, माझे मिस्टर पकडून चौथी टर्म आहे. खरोखरच त्यांनी त्यांच्या कालावधीमध्ये जे जे कार्य केले, ते माझे मिस्टर मला सांगतात की, ते खरोखरच हुशार आहेत. आणि मी इथे प्रत्यक्ष अनुभवलेले आहे. त्यांनी किती डॉक्टरेट पदव्या केल्या, विद्यार्थ्यांसाठी किती केले हे सर्व तुम्हाला माहिती आहे. सर्वांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केलेले आहे. मी प्रभु चरणी एवढीच प्रार्थना करते की, परमेश्वराने या पृथ्वीतलावर असताना त्यांचे संपूर्ण त्यांना जे शरीर दिलेले आहे, त्या शरीराद्वारे या पृथ्वीवर असताना त्यांनी जे कार्य केले ते कार्य करण्यासाठी परमेश्वराने त्यांना चांगली बुध्दी दिली त्याबद्दल मी सर्वात प्रथम देवाचे आभार मानते. आणि या पृथ्वीतलावर असताना त्यांच्या हातून कळत-नकळत ज्या काही चुका झाल्या असतील परमेश्वराने त्यांच्या संपूर्ण झालेल्या पापाबद्दल, चुकांबद्दल क्षमा करुन त्यांना स्वर्ग राज्याचे बक्षिस बहाल करावे. परमेश्वराने त्यांना संपूर्ण डोक्यापासून केसापर्यंत निर्माण केलेले आहे आणि त्यांना चांगले अवयव दिलेले आहेत. त्यांना जे मन दिलेले त्या मनामध्ये त्यांनी इतरांबद्दल वाईट विचार केले असतील तर मी प्रभु तुझ्याजवळ त्यांच्याबद्दल वाईट विचार केले असतील तर मी प्रभु तुझ्याजवळ त्यांच्याबद्दल क्षमा मागत आहे. त्यांना जी जीभ दिले त्या जीभेबद्दल त्यांनी इतरांना दुखवले असेल तरी प्रभु मी तुझ्याजवळ क्षमा मागते आणि प्रभू तू त्यांना जे हृदय दिलेले, त्या हृदयाद्वारे त्यांनी इतरांना दुखवले तर त्याबद्दल मी क्षमा मागते. प्रभु त्यांना जे हात दिलेले आहेत त्या हाताद्वारे त्यांच्या हातून वाईट कृत्य घडले असेल तर त्याच्याबद्दल मी क्षमा मागते. त्यांना पाय दिलेले त्या पायाद्वारे इतर ठिकाणी वाईट दृष्टीने गेले असतील, त्यांनी त्यांच्या पत्नीला दुखावले, वाईट कृत्य केले असतील त्याच्याबद्दल मी तुझ्याकडे क्षमा मागते प्रभु. कारण प्रभु तु त्यांना शुन्यातून निर्माण केलेले आहे. त्याच्या बॉडीच्या प्रत्येक अवयवाबद्दल प्रभु तुला माहिती आहे. त्यांची जी काही वाईट कृत्ये झाली असतील ती तुला ठाऊक आहेत, परमेश्वरा त्यांना क्षमा कर. सर्व पापांची क्षमा करुन तु त्यांना स्वर्गलोक दे. त्यांची पत्नी, त्यांचे संपूर्ण कुटुंब मी तुझ्या हातात देत आहे. प्रभु, तुझे वचन सांगत आहे, एक वेळ आई आपल्या मुलाला विसरेल, परंतु मी तुम्हाला विसरणार नाही. हे प्रभु, परमेश्वरा आज आई त्या मुलांकडे आहे, परंतू त्यांचा पिता त्यांच्यापासून निघून गेलेला आहे. परंतू, तू त्यांचा पिता आहेस. त्या आईला तू ध्येय आत्मियता दाखवून दे. तिच्या मुलींचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी, वडीलांचे आणि आईचे प्रेम देण्यासाठी प्रभू परमेश्वरा तूझी विशेष कृपा आणि सामर्थ्य दे. तिच्या कुटुंबाचे संरक्षण कर आणि प्रभु येशू खिस्ता त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला तुझ्या पवित्र आत्म्याचे कवच निर्माण कर आणि तुझ्या पवित्र आत्म्याने त्यांना परिपूर्ण कर हिच प्रार्थना तुझ्याकडे करते.

**रामनारायण दुबेः-**

स्वर्गिय श्री. प्रफुल्ल पाटील साहब की जो पिछले दिनों जघन्य हत्या की गयी। आज इस मा. महासभा मे सब सन्मा. सदस्यों ने अपने चर्चा के माध्यम से उनके विषय मे प्रकाश डाले। मै पहली बार नगरसेवक बनकर इस सभागृह मे आया। और श्री. प्रफुल्ल पाटील साहब कभी भी किसी से भी मिलते थे तो हमेशा एक उपदेश के दिशा मे हम लोगो को सज्ञान देते थे। कभी भी ऐसा नही लगता था की, किसी

विशिष्ट पक्ष के नेता है। जैसा अभी मा. श्री. मिलन पाटील साहब बताए की, यहा पर छोटी-छोटी बात पर पक्ष मे कितनी झगडे, लढाई की बात पैदा होती है। कैसा भी गंभीर विषय रहे, जैसा हम पिछले दो-ढाई वर्षो से देख रहे है। मा. महासभा मे किसी का भी विषय हो, कैसा भी हो, श्री. प्रफुल्ल पाटील साहब उसका इतना अच्छा प्रभावित उत्तर देते थे की, ऐसा नही लगता था की, कीसी पक्ष के खिलाफ उनकी आवाज निकल रही है। बहोत दुःख होता है की, ऐसे होनहार नेता इस मिरा भाईंदर शहर से और इस तरह से सबको छोडकर चले जाते है। यह बडी दुःखदायी बात है और बडी गंभीर बात है। मै उनके इस निधन पर अपने परिवार के तरफ से, पक्ष के तरफ से, अपने सामाजिक संस्थांओं के तरफ से मै उनको बहोत-बहोत श्रध्दांजली अर्पित करते हूए, परमपिता परमेश्वर से यह प्रार्थना करता हू की, उनके परिवार को सहनशक्ती दे और उनके आत्मा को चिरशांती प्रदान करे।

**आसिफ पटेलः-**

मा. अध्यक्ष महोदय, माजी नगराध्यक्ष, ज्येष्ठ नगरसेवक, शिक्षणसम्राट कैलासवासी श्री. प्रफुल्ल पाटील यांच्यावर ८ मे रोजी झालेला हल्ला फार भ्याड हल्ला होता. आणि खरोखरच तो निषेध करण्यासारखा होता. मी त्या घटनेचा निषेधच करतो. माझ्या सहकारी श्रीम. वंदना चक्रे मॅडम म्हणाल्या की, त्यांना लगेचच फाशी दयायला पाहिजे. त्याच्याशी मी सहमत आहे पण आणि नाही पण. कारण भारताचे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहीलेले आहे. आणि ते न्यायालयाकडेल जावे लागेल आणि न्यायालयच फाशी देऊ शकतो. तो हक्क न्यायालयाकडे आहे. लवकरच फाशी दयायची असेल तर त्या आरोपींना उचलून अरबस्तानला पाठवावे लागेल. कारण तिथे कुठलाही खटला आठ दिवसाचे पलिकडे प्रलंबित ठेवता येत नाही. त्याला लगेचच फाशी दिली जाते. इथे ते होणार नाही. या देशाची खरोखरच शोकांतिका आहे की, या देशात ५० वर्षापासून खटले प्रलंबित पडलेले आहेत. तारीख पे तारीख. माझे सहकारी, माझे मित्र श्री. मिलन म्हात्रे म्हणाले की, आमचे गृहमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी सांगितले होते की, आम्ही दोन दिवसात आरोपी पकडू. स्वतः श्री. आर.आर. पाटील पकडायला जाणार नाहीत. त्यांनी एक वेगळी यंत्रणा नेमली. आणि त्या यंत्रणेमध्ये श्री. लोहार साहेब डी.वाय.एस.पी. आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली ते आरोपींना शोधत, आय.जी. कडे सूपूर्द केली होती. आय.जी. नी श्री. लोहार साहेबांकडे ती एन्क्वायरी सुपूर्द केली. आणि ते स्वतःही लक्ष घालत आहेत. आत्ता आरोपी जर यु.पी. ला पळाले आहेत तर दोन दिवसात त्यांना पकडणे शक्य आहे का? ते पकडले जातील. श्री. आर.आर. पाटील यांनी सांगितले की, दोन दिवसात आरोपी पकडले पाहिजेत, याचा अर्थ आरोपी शहरातच नाहीत की, त्यांना लगेच पकडले पाहिजे किंवा ते लगेच मिळाले पाहिजे. ज्यांनी एवढे मोठे प्लॅनिंग करुन गेम केला ते लगेच सहजा-सहजी मिळणार आहेत का? शक्यच नाही. त्यांच्याबरोबर कोण भांडला. भांडण तर होतेच. आत्ता वैचारिक मतभेद असतात. प्रत्येकाचे बोलणे प्रत्येकाला पटेल हे कधीच होत नाही. खरोखरच ते अभ्यासू होते. त्यांच्यावर जो भ्याड हल्ला झाला, त्या भ्याड हल्ल्याचा या सभागृहाचे सर्व सदस्य निषेध करतात. आणि खरोखरच मी मनापासून माझीही इच्छा आहे की, त्या आरोपींना ज्यांनी कोणी हे भ्याड कृत्य केलेले आहे, त्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. त्याच्यासाठी लोकांनी प्रयत्न केला पाहीजे. त्यांना लगेच फाशी दिली पाहिजे. हे आपल्या हातात नाही. मी आणि माझा संपूर्ण परिवार कै. श्री. प्रफुल्ल पाटील यांच्या दुखःद घटनेबद्दल त्यांच्या परिवाराच्या दुःखात सहभागी आहे. आणि खरोखरच असा व्यक्ती हरपलेला आहे. ज्याची पूर्तता कधीच या सभागृहामध्ये होणार नाही. इतकेच सांगून माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद। जय महाराष्ट्र।

**भगवती शर्माः-**

आज इस सदन मे एक ऐसे नगरसेवक जिसकी जितनी प्रशंसा की जाए उतनी कम होगी। प्रत्येक सदस्य ने अपने शब्दों के माध्यम से अपनी भावनाओं को इस श्रध्दांजली के माध्यम के व्यक्त किया। श्रीम. सुधा व्यासजी ने जो शब्द कहे की, हमारे जैसे अनेक नगरसेवक इस सदन के अंदर पहली बार प्रवेश किया। अभ्यास नया-नया था। लेकीन श्री. प्रफुल्ल पाटील जी जब भी किसी विषय पर चर्चा करते थे, बडी गंभीरता से, हम सभी नगरसेवकों के लिए सिखने का एक पाठयक्रम होता था। इस सदन के अंदर नये सदस्यों ने निश्चित रुप से उनके बहोत कुछ सिखने का प्रयास किया। मै स्वयं उनके पास जाता था। किसी विषय में चर्चा करता था। वह हमारा मार्गदर्शन करते थे। इस शहर के अंदर विकासकार्य मे वह सतत प्रयास करते थे। और इस सदन के माध्यम से उन्होने ऐसे बहोत कार्य करने का भरपूर प्रयास किया और उसके अंदर उन्होने काफी सफलता भी पायी। अब एक चर्चा विषय के अंदर, श्रध्दांजली के विषय के अंदर, संगणक के विषय के अंदर श्री. मिलन म्हात्रेजी ने उनके विषय पर कहा था। निश्चित रुप से वो हमेशा यह प्रयास करते थे की, कोई भी व्यक्ती हो, उसको न्याय मिले। उस न्याय के प्रक्रिया के अंदर वो हमेशा अपनी एक लडाई अनोखे ढंग से लढते थे। और इस सदन के अंदर बोलने की उनकी जो कला थी, अभ्यास था, वह एक प्रशंसनीय, जितने भी शब्दों के माध्यम से करे उतने ही कम होगी। ८ मई का दिन इस मिरा भाईदर के लिए काला दिन के रुप मे था। जिस व्यक्ती ने भी उस घटना का सुना उसको उस समय विश्वास नही हो पा रहा था की, इस शहर मे ऐसी घटना घट गयी है। एक दुसरे को पुछ रहे थे की, ऐसी घटना घट गयी है क्या? ऐसी घटना का जितना भी निषेध किया जाए, कम है। और वो दिन मिरा भाईंदर मे काला दिन के रुप मे

था। हम सभी ने एक अच्छे व्यक्ती को इस शहर मे खोया है। इस सदन ने भी एक अच्छा व्यक्ती, जो इस सदन मे हमेशा मानमर्यादा के सिमाओं मे रहकर एक लढाई लढी, उस सदस्य को खोया है। शक्तीपूर्ण होना बहोत ही कठीन है। मै राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष के तरफ से स्वर्गीय श्री. प्रफुल्ल पाटील जी को श्रध्दांजली देता हू। परमपिता परमेश्वर से प्रार्थना करता हू की, उनकी आत्मा को शांती मिले। और ईश्वर उनके पूरे परिवार को इतनी शक्ती दे की, इस दुःखद घटना से वह बाहर निकल सके।

**चंद्रकांत मोदीः-**

मा. नगराध्यक्ष श्री. प्रफुल्ल पाटील साहेब की देहांत पर जो हुआ, सही मे कायदे का एक राजा, मै उपनाम देता हू की, कायदे का राजा थे। और कोई भी विषय आक्रोश मे, क्रोध मे मा. महासभा के अंदर होता था, लेकीन वह उठकर जो जवाब देते थे, उससे सब एकदम शांत हो जाते थे। और महाराष्ट्र की सभी महानगरपालिका में, कौनसी महानगरपालिका मे कौन से कायदे से कौनसा विषय चल रहा है यह मॅसेज लाने का काम श्री. प्रफुल्ल पाटील साहब करते थे। और श्री. प्रफुल्ल पाटील साहब ने मिरा भाईंदर के भुमिपुत्र, उन्होने शहर के लिए जो काम किया है, और उनका जो ऐसा था की, आजतक मै उसको २०-२५ साल से पहचानता हु। लेकीन बताना चाहता हू की, सब सदस्यों को भी मालूम होगा, कभी उन्होंने उंची आवाज से बात नही कीया। कभी कोई सामने क्रोध से बात करेगा, आज तक उन्होंने कभी उंची आवाज से बात नही किया। ऐसी व्यक्ती को, जिसने यह काम किया है, उनको बराबर सजा मिलनी चाहिए। और भगवान को यह प्रार्थना करता हू की, उनके सभी परिवारजनों को सहन करने की शक्ती दें।

**शानू गोहिलः-**

कार्यसम्राट श्री. प्रफुल्लजी पाटील, जिनके बारे मे हमारे सभागृह मे सभी लोगोंने अपने विचार व्यक्त किए उनको श्रध्दांजली दी। छोटा मुँह बडी बात, हम तो उनके सामने बहोत छोटे है, उनके बारे मे कहना। लेकीन फिर भी मै एक बात कहना चाहूँगी, जब-जब किसी भी विषय पर चर्चा होती, शहर का विषय हो, तो श्री. प्रफुल्लजी पाटील का नाम सबसे पहले आता। क्योंकी उन्होने इस शहर के लिए बहोत कार्य किए है। और इस मिरा भाईंदर शहर का नाम बहोत ऊंचा हुआ है। विशेषकर जो यहा की पानी की समस्या थी। मुझे आज भी याद है जो पानी का आंदोलन हुआ था, उसमे ट्रेने रोकी गयी थी। उसके बाद श्री. प्रफुल्लजी पाटील जब नगराध्यक्ष बने, उन्होंने उसपर डिपली काम किया। और इस शहर को पानी दिलाया। तो सबसे बडा कार्य जो उन्होंने किया है, लोगों को पानी पिलाने का, यह सबसे बहोत अच्छा कार्य उन्होंने किया और शहरवासी वो कभी नही भुलेंगे। आज शहरकों इसका सबसे बडा नुकसान, जो आज श्री. प्रफुल्लजी पाटील हमारे बीच मे नही है। मुझे वो दिन आज भी याद है जब भी चर्चा होती, तो हमे अगर उनसे कुछ पुछना होता तो वो कभी यह नही बोलते की, ठिक है, बाद मे बताता हू। तुरंत उस विषय पर वो चर्चा करते और हमे समझ मे नही आता था तो वो हम लोगो को अच्छी तरह से समझाते। इसिलिए उनकी कमी कभी कोई पुरी नही कर सकता है। और मै भगवान से प्रार्थना करती हू की, जो दुःख का पहाड उनके परिवारपें टुटा है। भगवान उनको शांती दे और उनपर जो दुःख का पहाड टुटा है, वो सहन करने की शक्ती दे। ऐसे दो शब्द मै पुरे करती हू। जय हिंद। जय महाराष्ट्र।

**शशिकांत भोईरः-**

उपस्थित सन्मा. व्यासपिठ, सभागृहातील सर्व नगरसेवक, पत्रकार बंधू, प्रेक्षक वर्ग, सर्वप्रथम मी मा. सभागृह नेते श्री. जयंतदादा पाटील यांचे आभार व्यक्त करतो. कारण आमच्या दादांसाठी त्यांनी खरोखरच एक श्रध्दांजलीचा कार्यक्रम लवकर होण गरजेचे होते, परंतू उशिरा का होईना पण श्रध्दांजलीचा तो कार्यक्रम इथे घडवून आणला. आणि आमच्या दादांचे जे स्थान या सभागृहात काय आहे ते पटवून देण्याचा प्रयत्न या सभागृहाने केला. आणि या सभागृहाने जी मान्यता दिली त्याबद्दल मी सभागृहाचा आभारी आहे. मा.डॉ. श्री. प्रफुल्ल काशिनाथ पाटील हे आपल्या सभागृहात एक विद्यमान नगरसेवक होते. आणि त्यांचे व्यक्तीमत्व असे होते की, अभ्यासू, जिद्दी आणि विद्वान व्यक्तीमत्व असणारे आमचे दादा एका फायद्यासाठी, स्वतःच्या फायद्यासाठी त्यांनी कधीही आपल्याकडे पाहिले नाही. परंतू, ज्यांनी त्यांची हत्या घडवून आणली, ती स्वतःच्या स्वार्थासाठीच घडवून आणली असेल. कारण त्यांची हत्या करण्याच्या मागे ज्याचे हेतू होते आणि त्यांनी घडवून आणली त्यांना फक्त त्यांचा फायदा झाला. परंतू, या मिरा भाईंदर शहराचे त्यांनी नुकसान केलेले आहे. त्यांची हत्या घडवून आणणाऱ्या आणि ज्यांनी हत्या केली या सर्व लोकांचा मी निषेध करतो. कारण आज प्रत्येकाने आपल्या भावना व्यक्त करताना जी दादाची या सभागृहाला गरज आहे, त्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. मी सर्वांचा आभारी आहे. दादांना कोणतीही भाषा अवगत असे. मराठी असो, हिंदी असो, गुजराती असो, इंग्रजी असो. त्यावर दादांचे एक प्रभुत्व होते. वस्तुस्थितीचे दर्शन, अर्थपूर्ण योग्य असा चक्क शब्दांचा वापर करावा तो दादांनीच. कारण कधीही ते विषयावर बोलत असताना एक जरी शब्द त्यांना त्यांच्या मनामध्ये खटकला किंवा त्यांच्या मनात समजला की, हा शब्द असा आहे. ते विषयाचे रुपांतर दुसरा शब्दांत ते कसे करायचे आणि सभागृहाला पटवून द्यायचे. ते व्यक्तीमत्व फक्त दादांजवळ होते. दादांचा कोणत्याही विषयावर अभ्यास करायचा असेल तर मला अनुभव आहे. कारण पूर्वी १९९७ मध्ये जेव्हा मी नगरसेवक झालो, त्यावेळेला मी कैलासवासी श्री. दिलीप बाबर यांच्या जोडीला काम करत होतो. तद्नंतर काही वर्षातच त्यांची हत्या झाली.

मी आत्ता पाहिले तर दादांजी, म्हणजे दोन हत्या या माझ्या मी ज्यांच्या जोडीला होतो, अशा महान व्यक्तींची झाली. श्री. दिलीप बाबरही तेवढेच महान होते की, त्यांनी मिरा भाईंदरमध्ये जेव्हा उपनगराध्यक्ष पद भुषविले त्यांची जी काम करायची ताकद होती, पूर्ण मिरा भाईंदर त्यांना विचारत होते, काम करायची जिद्द होती आणि लोकांची कामे करायचे. त्याचप्रमाणे मी त्यांच्या जोडीला असताना दादा जेव्हा सभागृहात बोलायचे तर मलाही दादांबद्दल आधार वाटायचा की, यांच्या जोडीला मला काम करण्याची संधी कधी मिळेल. आणि काही काळातच श्री. दिलीप बाबर यांची हत्या होऊन मी जेव्हा २००२ चे महापालिकेचे इलेक्शन लागले तेव्हा दादांच्या सोबत मिरा भाईंदर विकास आघाडीतर्फे उभा राहिलो आणि आम्ही सहा नगरसेवक निवडून आलो. त्यावेळी मला त्यांच्या गटाचे नेतृत्व करण्याचा मान दादांनीच दिला. गटाचे नेतृत्व करताना कोणताही विषय असो, परंतू गटाला जोडीला घेऊनच अभ्यासपूर्वक दादांजवळ बसायचे व दादांजवळ टाईम घेऊन, दादा तुम्हाला वेळ कधी आहे. कारण आमच्या नगरसेवकांना तुमच्याजवळ या विषयावर बोलायचे आहे. ते कधीच बोलत नाहीत की, उद्या आहे. उद्या रात्री ये. रात्री मी एकटा न जाता आमचे सर्व पाच नगरसेवक आणि दादा असे सहाजण मिळून अभ्यास करायचो. अभ्यास करताना कोणताही अभ्यास असो, विषय सामाजिक असो, राजकीय असो, कोणताही असू दे. त्या विषयाचा सखोल अभ्यास करुन त्यांचा फायदा-तोटा काय आहे हे इतरांना जाणीव करुन देणारा दादा दिवस रात्रीचे भान विसरून रात्री अपरात्री एकटाच अभ्यास करत कधी-कधी माझ्या जोडीला आमच्या नगरसेविका, माजी नगरसेविका श्रीम. संगिता म्हात्रे, श्रीम. सुधा गोयंका, श्रीम. लिलाताई पाटील असायच्या. त्यांना आम्ही मध्येच सोडून द्यायचो. पण दादा बोलत नव्हते की, तू ही जा आणि यांना पण सोडून दे. मी याचा अभ्यास करेन आणि सभागृहामध्ये बोलेन. मग ते एवढे आम्हाला शिकायला मिळायचे की, दादांनी कधी-कधी सात वाजताच घरी गेलो आणि आंघोळ करून डायरेक्ट इकडे आलो. एवढी त्यांची ठराव करायची पध्दत वगैरे अशी होती की, कोणताही अभ्यास केला तर त्याचा पाठपुरावा करुन तो फायदा प्रशासनाला कसा होईल याबद्दल आणि जनतेला त्याच्यातून कसा फायदा होईल हे खरोखरच दादांकडून शिकणे गरजेचे होते. प्रशासनाचे बोलायचे असेल तर प्रशासन हाताळावे ते दादांनीच. प्रशासन खाजगी असो वा शासकीय असो, वा निमशासकिय असो, प्रशासनावर दादांचा धाक असायचा. दादांना फसवणे कुणीही अशक्य होते. कोणी धुळफेक करायचा प्रयत्न केला तर त्यांच्या डोळयात दादा झणझणीत अंजन घालीत. कारण नियम कायदे तोंडपाठ. म्हणूनच महानगरपालिकेत ते कोणत्याही हुद्दयावर नसले तरी ते सत्ताधिश वाटायचे. आणि प्रशासन त्यांच्यासमोर नम्र असायचे. आत्ता सर्व नगरसेवकांनी याबद्दल श्रध्दांजली वाहिलेली आहे. जसा दादांचा एक ध्यास होता. जेव्हा नगराध्यक्ष असताना त्यांनी मिरा भाईंदर शहराच्या कल्याणासाठी ध्यास घेतला केवळ अडीज वर्षाच्या काळात रस्ता रुंदीकरण, पाणी पुरवठा, तलाव सुशोभिकरण, खुले रंगमंच, समाजगृहे, स्मशानभुमी सुशोभिकरण, प्राथमिक शाळा या सुविधा त्यांनी पूर्ण केल्या. विशेष म्हणजे रहदारीला अडचण असणाऱ्या शिवसेनेच्या तीन शाखा होत्या. त्या बाजूला हटवून त्यांचे पूर्नवसन करुन त्यांना पर्यायी जागा देवून शाखा बांधून दिल्या. म्हणूनच त्यांना कार्यसम्राट, पाणीसम्राट या पदव्या लोकांनी बहाल केलेल्या आहेत. शिक्षणात म्हटले तर मिरा भाईंदर शहरातील विद्यार्थ्यांना प्रगत शिक्षणासाठी बाहेर जायला लागू नये म्हणून अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाच्या माध्यमातून इंजिनिअर, फार्मसी, पॉलीटेक्नीक, एम.बी.ए., एम.सी.ए., बी.एड.,बी.एस.सी., आय.टी. बी.लीप. अशा आधुनिक शिक्षणाचा उपक्रम राबवणारे दादा शिक्षणसम्राट होते. आणि शिक्षणामध्ये जे गरजू, गरीब लोक होते त्यांना नेहमी दादा सढळ हाताने मदत करत. जो गरीब, खरोखर शिकणारा विद्यार्थी असेल त्यांना कपडे, वहया-पुस्तके, त्यांची फी भरणे हे दादांनी कधीच टाळले नाही. त्यांना शिक्षणासाठी साथ दिली. असे दादा आपल्याला सोडून गेलेले आहेत. त्यानंतर शेतकऱ्यांचे मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये बरेच प्रश्न होते की, इस्टेट इन्वेस्टमेंट इंडीया ही कंपनी आपली सापाची कुंडली मारुन बसलेली आहे. त्यांची फाईट करण्यासाठी दादांजवळ एवढे सामर्थ्य होते की, अनेक कायदे त्यांनी हाताळले. फाईट करण्यासाठी ते कोर्टापर्यंत गेले. आणि या शेतकऱ्यांना त्यांनी एक भरोसा दिला. ते आत्ताच त्यांची निघृण हत्या केल्यामुळे ते आपल्याला सोडून गेले. त्यांचे अपूर्ण राहिलेले काम आमच्या या सभागृहामध्ये हुशार असणारे सर्व नगरसेवकांनी हाती घेऊन त्यांचे हे काम पूर्ण केले तर आपल्या शेतकरी बांधवांना खरोखरच एक दिलासा मिळेल. मी विनंती करेन की, ज्याप्रमाणे सभागृहाचे त्यांनी नेतृत्व केले. बऱ्याच विषयावर कोणताही पक्ष असू दे तरी त्यांनी साथ दिली. त्यांची एक स्मृती या सभागृहात राहण्यासाठी मी सभागृहाला विनंती करेन की, त्यांचा एक फोटो या सभागृहात लावण्यात यावा. त्याचप्रमाणे मी त्यांच्या कुटूंबियांच्या वतीने आणि त्यांचा एक सहकारी या नात्याने मी या सभागृहाला आजही विनंती करतो, संपूर्ण सभागृहाची मला संमती असेल की, जेसल पार्क पासून घोडबंदर पर्यंत जो डी.पी. रोड आपण बनवणार आहोत, त्याला खरोखरच दादांचे नाव दिले, डॉ. श्री. प्रफुल्ल काशिनाथ पाटील मार्ग, तरच आपण या सभागृहाने त्यांना खरी श्रध्दांजली दिली आणि महापालिकेने त्यांचे केलेले कार्य याची त्यांना सहानूभूती देऊन आपण या नामकरणामध्ये सर्व पक्ष एकत्र येऊन त्या रस्त्याला नाव द्यावे हि मी आग्रहाची विनंती करतो. आणि तीच खरी श्रध्दांजली या सभागृहाची असेल. माझ्या कुटुंबाच्या वतीने, अभिनव शेतकरी मंडळ, माझ्या जोडीला जेवढे सहकारी मित्र मंडळ असतील त्यांच्या वतीने दादांना आणि पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो. धन्यवाद।

**ओमप्रकाश अग्रवाल:-**

मा. महापौर साहेब, श्री. शशिकांत भोईर यांनी जी सुचना मांडलेली आहे, ती सुचना आज या सभागृहामध्ये होऊ शकत नाही. पण मा. स्थायी समितीचे सभापती यांना विनंती करतो की, त्यांनी येणाऱ्या मा. स्थायी समिती सभेमध्ये तो प्रस्ताव आणून ताबडतोब या मा. महासभेमध्ये आणून त्यांच्या या रस्त्याचे नामकरण करण्यामध्ये या सभागृहाची संमती द्यावी अशी मी त्यांना आग्रह पूर्वक माझी विनंती करतो.

**मा. आयुक्त:-**

मा. श्री. प्रफुल्ल पाटील यांच्या निधनाने या सभागृहाचे आणि प्रशासनाचे फार मोठे नुकसान झालेले आहे. गाढ अभ्यासू आणि त्यांच्या पूर्वीच्या कारकिर्दीमध्ये मी सी.ई.ओ. म्हणून काम केलेले होते. कायद्याचा अभ्यास फार मोठा होता. विकासाचा ध्यास होता. आणि त्यांनी पाणी पुरवठा असेल, काशिमिरा रोड असेल, स्टेशन रोड असेल, डी.पी. रोड असेल या रुंदीकरणामध्ये मला चांगल्या प्रकारे मदत केली. आणि सर्व योजना राबविण्याचा त्यांचा अतोनात प्रयत्न होता. प्रत्येक गोष्टीत, प्रत्येक कायद्यामध्ये काय मार्ग काढून कोणत्या प्रकारे, कशा पध्दतीने काम करावे, याचे ज्ञान फार मोठे होते. सामाजिक काम करत असतानाच त्यांनी शैक्षणिक कामातसुध्दा वेगवेगळया विविध शाखा मिळवून या गावकऱ्यांची मुले बाहेर शिकायला जाऊ नयेत आणि त्यांनी चांगल्या प्रकारे शिक्षण घ्यावे यासाठी त्यांनी अतोनात प्रयत्न केला. छोटीशी असलेली शाळा त्यांनी महाविद्यालयात रुपांतर केले. विविध विभाग खोलले. याबद्दल वेगवेगळया संस्थांनी त्यांना पुरस्कार दिले. या सभागृहानेसुध्दा त्यांचे अभिनंदन केले. प्रशासनाला मार्गदर्शक होते. त्या पध्दतीने सभागृहालासुध्दा ते मार्गदर्शन करत होते. त्यांची जिद्द फार मोठी होती आणि अभ्यासू व्यक्तीमत्व होते आणि प्रत्येक व्यक्तीला कशा पध्दतीने मार्ग काढावा याचे ज्ञान आणि मार्गदर्शन करत होते. त्यांच्या निधनाने या सभागृहाचे, प्रशासनाचे आणि या गावाचे जे नुकसान झाले ते न भरुन निघणारे आहे. माझ्या कुटुंबियांच्या वतीने आणि प्रशासनाच्या वतीने मी त्यांना श्रध्दांजली वाहतो आणि त्यांच्या कुटुंबाला यातून मार्ग काढण्यासाठी देवाने त्यांना सद्‌गती देवो, शक्ती देवो अशी देवाजवळ प्रार्थना करुन माझे दोन शब्द संपवतो.

**प्रेमनाथ पाटील:-**

मा. महापौर साहेब, दादांबद्दल बोलायचे तर मी आठ वर्षे त्यांच्या बरोबर होतो. त्या आठ वर्षामध्ये ते कधीही सभागृहामध्ये जेव्हा कुठल्याही विषयावर बोलतात, त्या वेळेला आम्ही सभागृहामध्ये टाचणी पडली तरी आवाज येईल असे सभागृहामध्ये शांत असायचे. दादांना भुषण सम्राट आणि दादांना मिळालेली जी पदे आहेत ती, ओपन इंटरनॅशनल युनिर्वसिटी, कोलंबो, श्रीलंका या संस्थेतर्फे ''डॉक्टरेट ईन लेक्चरर'' पुरस्कार, ओपन इंटरनॅशनल युनिर्वसिटी, कोलंबो, श्रीलंका या संस्थेने ''नेल्सन मंडेला'' शांती पुरस्कार, ईकोनॉमिक ग्रोथ सोसायटी ऑफ इंडीया, न्यु दिल्ली या संस्थेने '' इंडो-नेपो फ्रेंडशिप'' पुरस्कार, इकोनॉमिक ग्रोथ सोसायटी ऑफ इंडीया, नवी दिल्ली या संस्थेने ''गोल्ड स्टार रशिया इंटरनॅशनल'' पुरस्कार, इकोनॉमिक ॲण्ड हयुमन रिर्सोरेस डेव्हलोपमेंट असोसिएशन, नवी दिल्ली या संस्थेने '' इंटरनॅशनल गोल्ड स्टार'' पुरस्कार, ''ग्लोबल सोसायटी फॉर हेल्थ ॲण्ड एज्युकेशन ग्रोथ'' या संस्थेने ''भारत शिक्षारत्न'' पुरस्कार, ॲविएचर इंस्टीटयुट ऑफ इंडीया, नवी दिल्ली या संस्थेने ''हींद का गौरव'' पुरस्कार, इकोनॉमिक ग्रोथ सोसायटी ऑफ इंडीया, नवी दिल्ली या संस्थेने ''राष्ट्रीय विकास रत्न पुरस्कार'', ऑल इंडीया बिझनेस डेव्हलोपमेंट असोसिएशन, नवी दिल्ली या संस्थेने ''भारतीय रत्न पुरस्कार'' इंडीयन ऑरगनायजेशन ऑफ बिजनेस रीसर्च ॲण्ड डेव्हलोपमेंट नवी दिल्ली या संस्थेने ''रतन ज्योती'' पुरस्कार, इंडीयन इकोनॉमिक डेव्हलोपमेंट ॲण्ड रिसर्च असोसिएशन, नवी मुंबई या संस्थेने ''लाईफ टाईम अचिव्हमेंट पुरस्कार फॉर एज्युकेशन एक्सलेंस'' हेल्थ ॲण्ड एज्युकेशन डेव्हलोपमेंट असोसिएशन, नवी दिल्ली या संस्थेने ''लाईफ टाईम एडयुकेशन अचिव्हमेंट पुरस्कार २००९'' तसेच इंडीयन सोसायटीस फॉर इंडस्ट्रीज ॲण्ड इंटर अचिव्ह डेव्हलोपमेंट, नवी दिल्ली या संस्थेने ''राष्ट्रीय सन्मान पुरस्कार आणि गोल्ड मेडल'', इंडीयन इकोनॉमिक डेव्हलोपमेंट ॲण्ड रिसर्च असोसिएशन, नवी मुंबई या संस्थेने '' लाईफ टाईम अचिव्हमेंट पुरस्कार फॉर एज्युकेशन एक्सलेन्स'', ठाणे जिल्हा युथ कॉंग्रेस ग्रामीण यात बेस्ट परफॉरमन्स, मराठी वृत्तपत्र लेखन संघ, मुंबई या संस्थेने सन्मानचिन्ह, चतुरंग प्रतिष्ठान या संस्थेने जनक जीवन गौरव पुरस्कार, पी.पी. साने गुरुजी पुरस्कार, फातिमा इन्स्टीटयुट ऑफ मिरा भाईंदर यांनी कार्यसम्राट व पाणी सम्राट असे यांना भुषविलेले आहे. असे भुषणसम्राट दादा आपल्यापासून निघून गेले. मी माझ्या पक्षाच्या वतीने व माझ्या कुटुंबियांच्या वतीने व माझ्या मित्रमंडळींच्या वतीने मी दादांना श्रध्दांजली अर्पण करतो. जय हिंद। जय महाराष्ट्र।

**मा. महापौर:-**

श्री. प्रफुल्ल पाटील यांच्या निधनामुळे आपल्या सभागृहाला व मिरा भाईंदर शहराला अतिशय नुकसान झालेले आहे. कारण एक अभ्यासू व्यक्तीमत्व मी गेली, आम्ही एकत्र कॉंग्रेस पक्षामध्ये काम करत असताना, गेली पंधरा वर्षे ते लिखान करत होते आणि अतिशय हुशार बाबी काढत होते. पक्ष कसा वाढेल. त्यांच्यासमोर श्री. प्रफुल्ल पाटील अतिशय हुशार म्हणून सभागृहाने ठराव मांडला आणि श्री. प्रफुल्ल पाटील अतिशय हुशार

म्हणून सभागृहाने ठराव मांडला आणि श्री. प्रफुल्ल पाटील यांना मी ८९ साली अभिनव विद्यालयात कार्याध्यक्ष म्हणून घेतले कारण अतिशय हुशार, त्याच्यानंतर त्यांनी अतिशय प्रगती केली. नंतर आम्ही एम.एड. चे शिक्षण तयार केले. कॉलेज बांधले. नंतर मी स्वतः निवडणूक लावली आणि दहा वर्षे त्या ठिकाणी अध्यक्ष होतो. नंतर मी विचार केला की, या ठिकाणी श्री. प्रफुल्ल पाटील यांना देता आले तर, या ठिकाणच्या कामाचा त्यांना अभ्यास होतो. ते नविन प्रगती घडवून आणतील. म्हणून मी स्वतः अध्यक्ष असताना उपाध्यक्ष म्हणून राहीलो आणि दुस-या माणसाला अध्यक्षाचा चार्ज दिला आणि यांना कार्याध्यक्ष केले. त्याच्यानंतर आम्ही त्या शाळेसाठी महत्वपूर्ण योजना आणल्या. ती शाळा वाढविल्यानंतर आम्ही पक्षाच्या कार्यक्रमात होतो. १९९१ रोजी निवडणूक झाली. त्यावेळी आम्ही एकत्र अभ्यासपूर्वक निवडणूक केली. त्याच्यामध्ये अतिशय महत्वाचा विजय झाला होता. अशा त-हेने अभ्यासू होते. या ठिकाणी आज खरोखरच महापालिकेच्या निवडणूका झाल्यानंतर लगेच विचारले की, श्री. प्रफुल्ल पाटील मला चांगले सहकार्य करा. काही घाबरु नका अशा त-हेने त्यांनी स्वतः आश्वासन दिलेले होते. ज्या लोकांनी हल्ला केला, त्यांचा मी निषेध करतो. त्यांना परमेश्वराने चांगली जागा देऊ नये. ते आरोपी लवकर पकडावेत. मी स्वतः शासनाकडे, पोलिसांना काही होत नसेल, तर मी स्वतः तपासण्यासाठी त्यांच्याकडे पत्र देईन की, हा रिपोर्ट सि.आय.डी. कडे पाठवा. जेणेकरून हे आरोपी पकडले पाहिजेत. श्री. गणेश नाईक यांनासुध्दा फोन करुन सांगितले की, हे जे आरोपी आहेत, त्यांचा तुम्ही खरा शोध लावा. आणि याच्यावर पाठपुरावा करावा. पण पोलिससुध्दा दुर्लक्ष करत आहेत. खरोखर खरे आरोपी शोधायला जात नाहीत आणि भलत्याच ठिकाणी तपास करत आहेत. खरे आरोपी त्यांना माहिती आहेत असा माझा आरोप आहे. कारण आपण नीट तपास लावला पाहिजे. म्हणून मी वारंवार पोलिस स्टेशनला सांगतो की, तुम्ही नीट तपास लावा. खरे आरोपी शोधून काढा. लवकरात लवकर तपास होऊन खरे आरोपी पकडले जातील अशी मी परमेश्वराकडे प्रार्थना करतो आणि श्री. प्रफुल्ल पाटील यांच्या कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती परमेश्वराने द्यावी आणि आपण सर्वांनी श्री. प्रफुल्ल पाटील यांच्या आत्म्याला शांती मिळण्यासाठी या ठिकाणी दोन मिनिटे उभे राहून त्यांच्या आत्म्याला शांती द्यावी हि आपल्या सर्वांना विनंती आहे.

**नगरसचिवः-**

सर्वांनी दोन मिनिटे जागेवर उभे राहून श्री. प्रफुल्ल पाटील यांना श्रध्दांजली वाहायची आहे.

**जयंत पाटीलः-**

सचिव साहेब, पुढच्या मा. महासभेची तारीख आपण इकडेच जाहिर करा.

**नगरसचिवः-**

पत्र पाठवतो.

**मिलन म्हात्रेः-**

पण सभागृहाची पध्दत अशी आहे की, आज जी तहकुब केलेली सभा आहे. त्याची तारीख आज सभागृहात डिक्लेअर करुन मग बाहेर पडायचे आहे. कारण यापूर्वीच्या तहकुब सभेला त्या-त्या मा. महापौरांनी त्यांची पुढची तारीख कधी हे सभागृहात डिक्लेअर करुन मग बाहेर पडायचे.

**जयंत पाटीलः-**

आत्ता सभेत तारीख जाहीर करायला काही प्रॉब्लेम आहे का?

**मिलन म्हात्रेः-**

केलीच जाते.

**मा. महापौरः-**

आजची तहकुब सभा या महिन्याच्या ३० तारखेला लावण्यात येईल. म्हणून आपल्या सर्व सभासदांना विनंती आहे की, आपण ३० तारखेला कुठल्या त-हेची वाट न बघता आपण या सभेला हजर राहावे ही विनंती करतो आणि आजची सभा तहकुब करतो.

**दुःखवटा ठराव क्र. ०९ :-**

काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नगरसेवक व मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये ज्यांनी आपल्या कर्तुत्वाने ख-या अर्थाने या शहराचे नाव रोषन केले. महानगरपालिकेची मा. महासभा असू दे किंवा इतर कार्यक्षेत्र असू दे त्यांचा दांडगा अभ्यास आणि प्रत्येक विषया विषयी असलेले सखोल ज्ञान, अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष आणि काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नगरसेवक प्रफुल्ल काशिनाथ पाटील ह्यांच्यावर दि. ८ मे २०१० रोजी भ्याड हल्ला झाला आणि त्यामध्ये त्यांचे दुःखद निधन झाले. भ्याड हल्ल्याचे माझ्या पक्षातर्फे आणि सर्व सदस्यांतर्फे मी त्याचा निषेध करतो. हा हल्ला खरं तर त्यांच्यावर नव्हता तर पूर्ण शहरावर तो हल्ला होता. अशाप्रकारचे एक व्यक्तीमत्व, ज्याने प्रतिकूल परिस्थितीशी झगडून आपले शिक्षण पूर्ण केले. आपल्या कामधंद्यामध्ये यश मिळवले आणि ते यश मिळवल्यानंतर या शहराबद्दल जे दायीत्व आहे, ते अभिनव शिक्षण संस्था सारखेच शेतकरी संस्था स्थापन करुन त्याच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले त्यांनी फार्मसी, बी.ए., डी.एड., इंजिनिअरिंग सारख्या नविन फॅकल्टीस सुरु केल्या. पायलट ट्रेनिंग स्कूल चालु करण्याचे त्यांचे पुढील स्वप्न होते. या शहरामध्ये त्यांनी एम.बी.ए. सारख्या फॅकल्टीज चालु केल्या. संपूर्ण जगामधून विविध देशांनी त्यांचा सत्कार केलेला आहे. किती तरी प्रकारच्या त्यांना डॉक्टरेट पदव्या मिळालेल्या

आहेत. नेपाळ गर्व्हमेंटकडून त्यांना डॉक्टरेट पदवी मिळणार होती आणि त्यांचा सत्कार पुढील काही महिन्यातच होणार होता. परंतु, त्या अगोरदरच हे भ्याड कृत्य या शहरामध्ये घडले आणि त्यामध्ये प्रफुल्ल काशिनाथ पाटील सारख्या एक अभ्यासू, जिज्ञासु नगरसेवकाचे दुःखद निधन झालेले आहे. मा. महासभेच्या सर्व सदस्यांतर्फे मी त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी आणि त्यांच्या कुटूंबियांना या प्रसंगातून बाहेर पडण्यास बळ मिळावं अशी प्रार्थना करुन दुःखवठा ठराव मांडतो.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत          अनुमोदक :- श्री. राजेश वेतोस्कर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिवः-**

३० जून रोजी मा. महापौरांनी तारीख घोषित केलेली आहे. ही तहकुब सभा ३० जून २०१० रोजी घेण्यात येईल.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- दुपारी १.१५ वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**